**जनसंपर्क अधिकारी**

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**

**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक :- २५९** **दिनांक :- १५/०९/२०२१**

# मोबाईल चोरी करणा-यास नालासोपारा पोलीसांनी ताब्यात घेवून मुद्देमाल केला जप्त.

मोबाईल चोरीच्या वाढते प्रमाणाचे गांभीर्य लक्षात घेवून वरिष्ठांनी सदर प्रकारांना आळा घालण्यासाठी व सदरचे गुन्हे उघडकीस आणणेसाठी आदेशीत केले होते. दिनांक २३/०८/२०२१ रोजी रात्रौ ११.४० ते दिनांक २४/०८/२०२१ रोजी सकाळी ०३.१० वाजताचे दरम्यान बी/१०१, साई केस्टल, साईबाबा मंदीराजवळ, हनुमान नगर, नालासोपारा पश्चिम येथे अज्ञात चोरटयाने फिर्यादी यांचे घरात सर्वजण झोपलेले असतांना फिर्यादीचे घराची किचनची स्लायडींग खिडकी सरकवून आत प्रवेश करुन घरातील ९,०००/- रुपये किंमतीचा मोबाईल हॅन्डसेट व १०,०००/- रुपये रोख रक्कम असे चोरी करुन घेऊन गेला आहे. त्याबाबत नालासोपारा पोलीस ठाण्यात दिनांक २४/०८/२०२१ रोजी गुरनं I ३७४/२०२१, भादंविसंक ४५७, ३८० प्रमाणे दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे अनुषंगाने तपास करीत असतांना दिनांक ०९/०९/२०२१ रोजी वरीष्ठांचे सुचनेप्रमाणे आरोपीताची माहीती काढीत असतांना गुप्त बातमीदारमार्फत बातमी मिळाली की, नमुद गुन्हा करणारा संशयीत आरोपीत याने काळया रंगाचा टी शर्ट व काळया रंगाची ट्रॅक पॅन्ट घालून तो नालासोपारा पश्चिमेकडील सर्व्हे नं.४११ येथील डेल्टा बिल्डींगचे बाजूचे बिल्डींग मध्ये आला असल्याची माहीती मिळाली. त्याप्रमाणे सपोनि/तळेकर व त्यांचे स्टाफने योजना तयार करुन बिल्डींगचे आजूबाजूस आरोपीत पळून जाणार नाही याची दक्षता घेऊन सापळा रचला. वरील वर्णनाप्रमाणे संशयीत आरोपीत हा सदर बिल्डींगचे खाली उतरत असतांना दिसला. तो खाली उतरल्यानंतर सपोनि/तळेकर यांनी केलेल्या सुचनेप्रमाणे त्याचे जवळ जाऊन त्यास ताब्यात घेतले. त्यास ताब्यात घेऊन त्याचेकडे नमुद गुन्हयाबाबत विचारपूस करता, नमुद गुन्हा त्याने व त्याचे सोबत सल्लाउद्दीन उर्फ सल्ला नावाचे इसमाने केला असल्याचे कबूल केले. त्याचे अंगझडतीत नमुद गुन्हयातील २,११०/- रुपये रोख रक्कम हस्तगत करण्यात आली आहे. त्याने सदरचा गुन्हा कबूल केल्याने त्यास नालासोपारा पोलीस ठाण्यात आणून त्याची चौकशी केली करुन त्याचे वयाबाबत त्याचा जन्मदाखला तपासला असता तो विधीसंघर्षित बालक असल्याचे समजले.

नमुद गुन्हयातील विधीसंघर्षित बालक याची त्याचे वडीलांचे समक्ष चौकशी केली असता खालील गुन्हयांची कबूली देऊन गुन्हयातील मुद्देमाल जप्ती पंचनाम्याद्वारे एकुण २०,११०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

| अ.नं. | नालासोपारा पो.स्टे. गुन्हा रजि.नंबर | जप्त मुद्देमाल | |
|---|---|---|---|
| १. | गुरनं I ३७४/२०२१, भादंविसंक ४५७,३८०. | ६,०००/- रु. | किमंतीचा निळया रंगाचा रियलमी कंपनीचा मोबाईल आय.एम.ई.आय.नं. ८६९६८००५०७६२०९४/८६९६८००५०७६२०६ त्यामध्ये सिमकार्ड नसलेला जु.वा.किं.सु. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | २,११०/- रु. | भारतीय चलनातील ५००/- रुपये दराच्या ४ नोटा, १००/- रुपये दराची एक नोट व १०/- रुपये दराची एक नोट. |
| २. | गुरनं I ३१५/२०२०, भादंविसंक ४५४, ४५७, ३८०. | ६,०००/- रु | किंमतीचा रेडमी नोट-५ कंपनीचा पांढरा व गुलाबी रंगाचा मोबाईल त्याचा आयएमईआय नं. १-८६९७८१०३८४८७५४७, आयएमईआय नं. २-८६९७८१०३८४८७५५४ जु.वा.कि.सु. |
| ३. | गुरनं I ३०३/२०२०, भादंविसंक ३८०. | ८,०००/- रु. | किमंतीचा निळया रंगाचा विवो वाय ११ कंपनीचा मोबाईल आय.एम.ई.आय.नं. ८६३०५००४४३००५७३ त्यामध्ये सिमकार्ड नसलेला जु.वा.किं.सु. |
| ४. | गुरनं I ४३३/२०२०, भादंविसंक ४५७,३८०. | | घरफोडी चोरीचा प्रयत्न |
| | एकूण | २०,११०/- रु. | |

सदरची कामगिरी श्री प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ-३, श्री चंद्रकांत जाधव, सहाय्यक पोलीस आयुक्त, नालासोपारा विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री विलास सुपे, नालासोपारा पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि/अमोल तळेकर, पोना/३०६ किशोर धनु, पोना/१६०८ कदम, पोना/१२५९ संदीप चव्हाण, पोना/१५६९ रुस्तुम राठोड, पोना/२१७७ सचिन कांबळे, पोशि/७०२ सचिन मोहीते यांनी केली आहे.

----ooo---